महाराष्ट्र शासन

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com


जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/1685/2024-25 दिनांक- 10/07/2024

## भारतीय वन सेवा (UPSC) मुख्य परीक्षा- 2024 करीता अर्थ सहाय्य योजनेचा तपशील

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील जे विद्यार्थी भारतीय वन सेवा पुर्व परीक्षा- 2024 उत्तीर्ण झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेसाठी एकरकमी अर्थ सहाय्य प्रदान करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**योजनेचे स्वरुप** :- भारतीय वन सेवा (UPSC) पुर्व परीक्षा- 2024 उत्तीर्ण झालेल्या व मुख्य परीक्षेसाठी पात्र नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती - भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना एकरकमी आर्थिक सहाय्य महाज्योती मार्फत देण्यात येईल.

**योजनेच्या लाभासाठी पात्रता** :-

1. विद्यार्थी महाराष्ट्रातील रहिवासी असावा. त्याचप्रमाणे नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती - भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गापैकी असावा.
2. विद्यार्थी हा भारतीय वन सेवा पुर्व परीक्षा- 2024 (दि.01/07/2024 रोजीच्या UPSC ने जाहिर केलेल्या निकालानुसार) उत्तीर्ण झालेला असावा.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे** :-

1. आधार कार्ड (पुढील व मागील बाजुसहित)
2. जातीचा प्रमाणपत्र (Caste Certificate)
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
4. पुर्व परीक्षेचे प्रवेश पत्र
5. बॅकेचे तपशील (बॅक पासबुक किंवा रद्द चेक)
6. भारतीय वन सेवा पुर्व परीक्षा- 2024 उत्तीर्ण झालेल्या निकालाची प्रत (बैठक क्रमांक ठळक करून देण्यात यावा.)

**अर्ज कसा करावा**:-

1. महाज्योती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **"Application Invited For Financial Assistance Those Who Qualified For Indian Forest Services Mains - 2024"** यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्ज भरतांना काही माहिती ही लाल रंगाच्या ‘ * ’ चिन्हाने दर्शविलेली असल्याने ती माहिती विद्यार्थ्यांना भरणे बंधनकारक आहे.
3. अर्जासोबत तपशीलात नमुद सर्व कागदपत्रे स्वाक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन जोडावे.

**अटी व शर्ती** :

1. अर्ज करण्याचा अंतीम दि.20/07/2024 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
4. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास तो/ती कायदेशीर कार्यवाईस पात्र राहील.
5. ज्या अर्थी शासन निर्णय क्र.सान्यावि-2023/प्र.क्र.60(4) दि.30/10/2023 मध्ये असे नमुद आहे की, "**एक विद्यार्थी/उमेदवार अधिछात्रवृत्ती, शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, इत्यादींचा एकदाच लाभ घेण्यास पात्र राहील.**" त्याअर्थी विद्यार्थ्याने यापुर्वी महाज्योतीच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतलेला असल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या सारथी या संस्थेकडून सदर योजनेचा लाभ घेत असल्याचे आढळून आल्यास विद्यार्थ्यांचे अर्ज ग्राह्य धरल्या जाणार नाही.
6. नमुद निकषांची पूर्तता न करणाऱ्या, अपूर्ण अर्ज सादर करण्याऱ्या किंवा अर्जासोबत कागदपत्रे न सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अर्ज बाद करण्यात येईल. त्याकरिता विभाग किंवा कार्यालय जबाबरदार राहणार नाही.
7. विद्यार्थाचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे.
8. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचणी आल्यास महाज्योतीच्या Call Centre वर संर्पक करावा किंवा ईमेलवर संपर्क साधावा.

   **संर्पक क्रमांक** :- 0712-2870120/07122870121

   E-mail Id :- mahajyotihelpdesk@gmail.com या ईमेलवर संपर्क साधावा

   **संस्थेचे संकेतस्थळ** (Website) :- www.mahajyoti.org.in

(स्वा.)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर.